Precision Camshafts Limited
(100% EOU Division)
Works : D-5,D-6,7,7-1, M I D C, Chincholi, Solapur 413 255

Date: 14th October, 2017

Sec/Oct/SE/N&B/09/2017

**The National Stock Exchange of India Limited**
Exchange Plaza, Bandrakurla Complex,
Bandra (E) Mumbai 400051
NSE Scrip Code: PRECAM

**BSE Limited,**
PhirozeJeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400001
BSE Scrip Code: PRECAM (539636)

**Sub: Press Release updates with respect to acquisition of MEMCO Engineering Pvt. Ltd., Nasik**

Dear Sir/Madam,

Please find enclosed press release under caption Precision Camshafts Limited for you reference and records.

Thanking you,

Yours Truly

For **Precision Camshafts Limited**

PRECISION CAMSHAFTS LIMITED SOLAPUR

**Ravindra R Joshi**
**Director**
**(DIN - 03338134)**

Phone : +91-9168646531/32/33 • Fax: 91 -217-2357645 • e-mail : info@pclindia.in • Website : www.pclindia.in
Regd. Office E-102/103 M.I.D.C., Akkalkot Road, Solapur-413 006 CIN-L24231PN1992PLC067126

सकाळ
सोलापूर, गुरुवार, १२ ऑक्टोबर २०१७
५

# नाशिकच्या मेम्को कंपनीवर आता 'प्रिसिजन'ची मालकी

## कॅमशाफ्टनंतर 'प्रिसिजन'चे इन्स्ट्रुमेंटेशन पार्ट्स उत्पादनात पदार्पण

सोलापूर, ता. ११ : नाशिक येथील मेम्को इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनी आता प्रिसिजन कॅमशाफ्ट्‌ लिमिटेडच्या मालकीची झाली आहे. अघोषित किमतीला ही कंपनीत संपादित केली असल्याची माहिती 'प्रिसिजन'चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी दिली.

मेम्को कंपनीची २०१६-१७ मधील आर्थिक उलाढाल ३० कोटी रुपये असून वार्षिक वृद्धीदर १८.५ टक्के आहे. मेम्को कंपनीमध्ये प्रामुख्याने सीआरडीआय डिझेल इंजिनसाठी लागणारे फ्युएल इंजेक्शन कंपोनेन्टस, ब्रेक कंपोनेन्टस तसेच जहाजांसाठी लागणारे हायप्रेशर डिझेल इंजेक्टर्स यासह इतर उत्पादने होतात. 'मेम्को'ने आतापर्यंत बॉश, डेल्फी, एण्ड्रेस हाऊजर, गिरो अशा ग्राहकांसोबत विश्वासार्हता जपत दीर्घकाळ व्यवसाय केला आहे. कॅमशाफ्ट उत्पादनात अग्रेसर असलेली प्रिसिजन आता इन्स्ट्रुमेंटेशन पार्टस उत्पादनात पदार्पण करत आहे. मेम्कोमुळे 'प्रिसिजन'ला नाशिकमधून व्यवसायवाढीची संधी यानिमित्ताने मिळाली आहे. मेम्कोचा व्यवसाय वाढविण्यासाठी आम्ही नव्या व जुन्या ग्राहकांच्या संपर्कात असल्याचेही शहा यांनी सांगितले.

'प्रिसिजन'चे संचालक व मुख्य वित्त अधिकारी रवींद्र जोशी म्हणाले, मेम्को कंपनीच्या संपादनामुळे प्रिसिजनला व्यवसायवृद्धी करण्याची मोठी संधी मिळाली आहे. राजन धारकर आणि सौ. विनिता धारकर हे पुढील दोन वर्षे मेम्कोची धुरा सांभाळणार आहेत.

**पाच खंडांत ७८ टक्के उत्पादन**

प्रवासी वाहने, ट्रॅक्टर, हलकी व्यापारी वाहने आणि रेल्वे इंजिनसाठी लागणाऱ्या जवळपास १५० प्रकारच्या कॅमशाफ्टचे उत्पादन व पुरवठा 'प्रिसिजन'च्या वतीने होतो. जनरल मोटर्स, फोर्ड, ह्युंदाई, महिंद्रा, एस्कॉर्ट्स, टाटा मोटर्स, मारुती सुझुकी अशा नामवंत कंपन्यांना प्रिसिजन कॅमशाफ्टचा पुरवठा करते. प्रिसिजनच्या एकूण उत्पादनांपैकी ७८ टक्के उत्पादन जगातील पाच खंडांत पुरविले जाते. जागतिक बाजारपेठेत प्रिसिजनचा वाटा नऊ टक्के आहे. संयुक्त करारामधून प्रिसिजनचे चीनमध्ये दोन प्रकल्प आहेत.

### 'मेम्को'ची ओळख...

**मेम्को ही आयएसओ/टीएस : १६९४९-२००९ आणि आयएसओ : १४००१-२००४ तसेच मटेरिअल ट्रेसॅबिलिटी ३.१ मानांकन मिळविलेली कंपनी आहे. राजन धारकर व सौ. विनिता धारकर यांच्या व्यवसायकुशल दृष्टीतून या कंपनीने अमेरिका, जर्मनी, ब्राझील येथील बाजारपेठांमध्ये स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.**



**सोलापूर : प्रिसिजन कॅमशाफ्ट कंपनीचा मेम्को इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड कंपनीसोबत व्यवहार झाल्यानंतर हस्तांदोलन करताना यतीन शहा व राजन धारकर. या प्रसंगी सुहासिनी शहा, विनिता धारकर, स्वप्नील कुलकर्णी, वेदांत पुजारी, उमा दिवाकर, निखिल दिवाकर.**

r

पुण्यनगरी
गुरूवार, १२ ऑक्टोबर २०१७

# 'प्रिसिजन'ने नाशिकची 'मेम्को' कंपनी केली संपादित



प्रिसिजन कॅमशाफ्टस्‌ कंपनीने नाशिकची मेम्को कंपनी संपादित केली. यावेळी यतिन शहा, डॉ. सुहासिनी शहा, राजन धारकर, विनिता धारकर व इतर.

सोलापूर / प्रतिनिधी

वाहनांच्या सुट्या भागांचे उत्पादन करणारी जागतिक पातळीवरील कंपनी 'प्रिसिजन कॅमशाफ्टस्‌ लिमिटेड'ने नाशिक येथील अचूक कंपोनेन्टस्‌ उत्पादित करणारी 'मेम्को इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड' (मेम्को) कंपनी संपादित केल्याची उद्घोषणा केली. प्रिसिजनचे हे पहिलेच संपादन आहे, अशी माहिती प्रिसिजनचे व्यवस्थापकीय संचालक यतिन शहा यांनी दिली.

नाशिकस्थित 'मेम्को' कंपनी आर्थिकदृष्ट्या मजबूत असून, १८ टक्के सकल वार्षिक वृध्दी दर (सीएजीआर) राखला आहे. 'मेम्को' कंपनीची वार्षिक १०.७ दशलक्ष घटकांची उत्पादन क्षमता असून बॉश, डेल्फी, एण्ड्रेस हाऊजर, गिरो अशा ग्राहकांशी दीर्घकालीन विश्वासार्हता मिळवत पुरवठा केला आहे. मेम्को प्रामुख्याने पारंपरिक सीआरडीआय डिझेल इंजिनसाठी लागणारे फ्यूएल इंजेक्शन कंपोनेन्टस्‌, ब्रेक कंपोनेन्टस्‌ तसेच जहाजांसाठी लागणारे हाय प्रेशर डिझेल इंजेक्टर्स तसेच विविध उपकरणांसाठी लागणारे अचूक घटक उत्पादित करते.

या संपादनामुळे उत्पादनातील अनुभव आणि वाढलेली आर्थिक सक्षमता यामुळे प्रिसिजनला नाशिकमधून व्यवसायवाढीची मोठी संधी प्राप्त झाली आहे. 'मेम्को'चा व्यवहार वाढण्यासाठी नव्या आणि जुन्या ग्राहकांशी आम्ही आधीपासूनच संपर्कात आहोत, असे शहा म्हणाले. प्रिसिजनचे संचालक आणि मुख्य वित्त अधिकारी रवींद्र जोशी म्हणाले की, व्यवसायाचा आकार, उत्पादन, भौगोलिक स्थान आणि प्रमाणबध्दता याचा विचार करता प्रिसिजनसाठी हे एक अतिशय उत्तम असे संपादन आहे. राजन धारकर आणि विनिता धारकर हे दोघे पुढील दोन वर्षाकरिता 'मेम्को'ची धुरा सांभाळणार आहेत.

चिल्ड कास्ट आयर्न, डक्टाईल आयर्न, हायब्रीड आणि असेम्बल्ड कॅमशाफ्ट उत्पादनामुळे प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड (पीसीएल) ही कंपनी कॅमशाफ्ट उत्पादनात 'वन टॉप सोल्यूशन' कंपनी बनली आहे. प्रिसिजन कंपनीकडे फोर्ड मोटर्स, जनरल मोटर्स, टोयोटा, मारुती सुझुकी, ह्युन्दाई, डेम्लर आणि पोर्श्चे अशा दिग्गज मूलभूत वाहन उत्पादक (ओइएम्स) सह मोठा ग्राहकाधार आहे.

तरुण भारत
www.tarunbharat.org

गुरुवार, १२ ऑक्टोबर २०१७

# प्रिसिजनकडून नाशिकच्या 'मेम्को'चे संपादन

## मेम्कोच्या संपादनामुळे प्रिसिजनचे उद्योगक्षेत्रात महत्त्व वाढणार

**प्रतिनिधी,**
**सोलापूर, दि. ११ ऑक्टोबर –** वाहनांच्या सुट्या भागांचे उत्पादन करणारी जागतिक पातळीवरील कंपनी प्रिसिजन कॅमशाफ्टस् लि.ने नाशिक येथील अचूक कंपोनेन्टस् उत्पादित करणारी मेम्को इंजिनिअरिंग प्रा.लि. (मेम्को) अघोषित किंमतीला संपादित केल्याची उद्घोषणा केली. प्रिसिजनचे हे पहिलेच संपादन आहे.

चिल्ड कास्ट आयर्न, डक्टाईल आयर्न, हायब्रीड आणि असेम्बल्ड कॅमशाफ्ट उत्पादनामुळे प्रिसिजन कॅमशाफ्टस् लि. (पीसीएल) ही कंपनी कॅमशाफ्ट उत्पादनात 'वन स्टॉप सोल्यूशन' कंपनी बनली आहे. अत्यंत मजबूत कार्यपद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रक्रिया या बळावर जागतिक पातळीवर गुणवत्तेच्या बाबतीत स्वत:चा एक बेंचमार्क निर्माण केला आहे. प्रिसिजनने आपल्या स्थापनेपासून एकाही क्षेत्रातील अपयश न येऊ देता ६० दशलक्ष कॅमशाफ्टचा पुरवठा केला आहे. प्रिसिजन कंपनीकडे फोर्ड मोटार्स, जनरल मोटार्स, टोयोटा, मारुती सुझुकी, ह्युन्दाई, डेम्लर आणि पोर्शे अशा दिग्गज मुलभूत वाहन उत्पादक (ओइएम्स) सह मोठा ग्राहकाधार आहे. मेम्को कंपनीच्या संपादनाच्या बाबतीतील ताज्या घडामोडीची घोषणा करताना प्रिसिजन कॅमशाफ्टस् लि.चे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक यतिन शहा म्हणाले की, या संपादनामुळे औद्योगिक नेतृत्व कणखर होण्यासाठी आणि वैविध्यपूर्ण उत्पादन श्रेणीमध्ये येण्यासाठी बळ मिळेल.

नाशिकस्थित मेम्को कंपनी आर्थिकदृष्ट्या मजबूत असून १८ टक्के सकल वार्षिक वृद्धी दर राखला आहे. मेम्को कंपनीची वार्षिक १०.७ दशलक्ष घटकांच्या उत्पादन क्षमता असून बॉश, डेल्फी, एण्ड्रेस हाऊजर, गिरो अशा ग्राहकांशी दीर्घकालीन विश्वासार्हता मिळवत पुरवठा केला आहे. मेम्को प्रामुख्याने पारंपरिक सीआरडीआय डिझेल इंजिनसाठी लागणारे फ्यूएल इंजेक्शन कंपोनेन्टस्, ब्रेक कंपोनेन्टस् तसेच जहाजांसाठी लागणारे हाय प्रेशर डिझेल इंजेक्टर्स तसेच विविध उपकरणांसाठी लागणारे अचूक घटक उत्पादित करते.

या संपादनामुळे उत्पादनातील अनुभव आणि वाढलेली आर्थिक सक्षमता यामुळे प्रिसिजनला नाशिकमधून व्यवसाय वाढीची मोठी संधी प्रापकत्र झाली आहे. मेम्कोचा व्यवसाय वाढण्यासाठी नव्या आणि जुन्या ग्राहकांशी आम्ही आधीपासूनच संपर्कात आहोत, असे शहा म्हणाले. प्रिसिजनचे संचालक आणि मुख्य वित्त अधिकारी रवींद्र जोशी म्हणाले की, व्यवसायाचा आकार, उत्पादन, भौगोलिक स्थान आणि प्रमाणबद्धता याचा विचार करता प्रिसिजनसाठी हे एक अतिशय उत्तम असे संपादन आहे. राजन धारकर आणि विनिता धारकर हे दोघे पुढील दोन वर्षांकरता मेम्कोची धुरा सांभाळतील.

अगदी अलिकडे प्रिसिजनने जनरल मोटार्सकडून सहा दशलक्ष फुल्ली फिनिश्ड कॅमशाफ्टचा जागतिक पातळीवरील व्यवसाय प्राप्त केला आहे. हा प्रकल्प जोपर्यंत चालू आहे तोपर्यंतसाठीचा हा करार आहे. या कराराचे अंदाजित एकूण मूल्य जवळपास ५८० कोटी इतके आहे. तसेच फोर्ड मोटार्स कडून जागतिक पातळीवरील आठ दशलक्ष फुल्ली फिनिश्ड कॅमशाफ्टचा व्यवसाय प्राप्त झाला आहे. ज्याचे एकंदर अंदाजित मूल्य रु. ५५० कोटी इतके आहे. सन २०१८-१९ पासून दोन्ही कराराअंतर्गत कॅमशाफ्टचे नियमित उत्पादन सुरू होईल. हे संपादन प्रिसिजनच्यादृष्टीने आगामी काळातील व्यवसाय वाढीसाठी मोठा आधार ठरणार आहे.

लोकमत सोलापूर, गुरुवार, दि. १२ ऑक्टोबर २०१७ २

# प्रिसिजनने नाशिकची मेम्को कंपनी केली संपादित

## करारावर सह्या: कॅमशाफ्टनंतर आता वाहनांचे सुटे भाग बनविणार

लोकमत न्यूज नेटवर्क



प्रिसिजनच्या वतीने नाशिकमधील कंपनी संपादित केली असून कंपनीबरोबर करार प्रसंगी प्रिसिजनचे चेअरमन यतीन शहा, सुहासिनी शहा व संचालक रवींद्र जोशी.

**सोलापूर :** वाहनांच्या सुट्या भागांचे उत्पादन करणारी जागतिक पातळीवरील प्रिसिजन कॅमशाफ्ट्स कंपनीने नाशिकची मेम्को इंजिनिअरिंग कंपनी अघोषित किमतीला संपादित केल्याची माहिती प्रिसिजनचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी दिली. अशाप्रकारे प्रिसिजनने आता वाहनाच्या इंजिनाचे सुटे भाग व इन्स्ट्रुमेंटेशन पार्टचे उत्पादन करण्याची तयारी केली आहे.

चिल्ड कास्ट आयर्न, डक्टाईल आयर्न, हायब्रीड आणि असेम्बल्ड कॅमशाफ्ट उत्पादनामुळे कॅमशाफ्ट्स लिमिटेड (पीसीएल) ही कंपनी कॅमशाफ्ट उत्पादनात वनस्टॉप सोल्युशन कंपनी बनली आहे. प्रिसिजनने मजबूत कार्यपद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान व प्रक्रियेच्या बळावर जागतिक पातळीवर गुणवत्तेच्या बाबतीत एक बेंचमार्क निर्माण केला आहे. स्थापनेपासून एकाही क्षेत्रात अपयश येऊ न देता कंपनीने आतापर्यंत ६० दशलक्ष कॅमशाफ्ट्सचा पुरवठा केला आहे. प्रिसिजनकडे फोर्ड, जनरल, टोयोटा, मारुती सुझुकी, ह्युंदाई, डेम्लर, पोर्श्चे अशा दिग्गज वाहन उत्पादन कंपन्यांची मागणी आहे. प्रवासी वाहने, ट्रॅक्टर, हलकी व्यापारी वाहने, रेल्वे इंजिन अशा १५० प्रकारच्या कॅमशाफ्ट्सचा पुरवठा कंपनी करते. प्रिसिजनच्या एकूण उत्पादनापैकी ७८ टक्के उत्पादन जगातील पाच खंडात करत जागतिक बाजारपेठेच्या ९ टक्के वाटा प्राप्त केला आहे. प्रिसिजनची अशी घोडदौड सुरू असताना मेम्को कंपनी संपादन करताना आमचे औद्योगिक नेतृत्व आणखी कणखर होणार असल्याचा विश्वास शहा यांनी व्यक्त केला.

### काय आहे मेम्को

- मेम्को प्रामुख्याने सीआरडीआय डिझेल इंजिनासाठी लागणारे फ्युएल इंजेक्शन, ब्रेक कंपोनेन्ट्स तसेच जहाजांसाठी लागणारे हायप्रेशर डिझेल इंजेक्टर्स व विविध उपकरणांसाठी लागणारे अचूक घटक उत्पादित करते. ही कंपनी आर्थिकदृष्ट्या मजबूत असल्याचे यतीन शहा यांनी सांगितले. कंपनीने १८ टक्के सकल वार्षिक वृद्धीदर राखला आहे. कंपनीची वार्षिक १०.७ दशलक्ष उत्पादन क्षमता आहे. बॉश, डेल्फी, एण्ड्रेस हाऊजर, गिरो या कंपन्यांना मालाचा पुरवठा केला आहे.

### नाशिकमधून मोठी संधी

- मेम्कोच्या संपादनामुळे प्रिसिजनला नाशिकमधून व्यवसायाची संधी मिळाली आहे, अशी प्रतिक्रिया संचालक व मुख्य वित्त अधिकारी रवींद्र जोशी यांनी व्यक्त केली. जुन्या ग्राहकांचा संपर्क व नवीन ग्राहक वाढविण्यावर भर राहणार आहे. राजन धारकर व विनिता धारकर हे पुढील दोन वर्षांसाठी मेम्कोची धुरा सांभाळणार आहेत. प्रिसिजनने जनरल मोटर्सबरोबर सहा दशलक्ष व फोर्डबरोबर आठ दशलक्ष फुल्ली फिनिश्ड कॅमशाफ्ट पुरवठ्याचा करार केला आहे. जनरलचे ५८० कोटी व फोर्डचे मूल्य ५५० कोटी इतके आहे. सन २०१८-१९ पासून या दोन्ही कराराचे कॅमशाफ्ट उत्पादन सुरु होईल.

दिव्य मराठी
सोलापूर, गुरुवार, १२ ऑक्टोबर २०१७ | ८

# सोलापूरच्या 'प्रिसिजन'कडून नाशिकची मेम्को इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड संपादित

## वाहन इंजिन, इंजिनशिवायचे सुटे भाग उत्पादित करण्याची 'प्रिसिजन'ची तयारी

प्रतिनिधी। सोलापूर



वाहनांच्या सुट्या भागांचे उत्पादन करणाऱ्या जागतिक पातळीवरील सोलापुरातील प्रिसिजन कॅमशाफ्टस् कंपनीने नाशिक येथील कंपोनेन्टस् उत्पादन करणारी कंपनी मेम्को इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड अघोषित किमतीला संपादित (टेकओव्हर) केल्याची घोषणा कंपनीचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा यांनी केली.

चिल्ट कास्ट आयर्न, डक्टाईल आयर्न, हायब्रीड आणि असेम्बल्ड कॅमशाफ्ट उत्पादनामुळे प्रिसिजन (पीसीएल) ही कंपनी कॅमशाफ्ट उत्पादनात वन स्टॉप सोल्युशन कंपनी बनली आहे. अत्यंत मजबूत कार्यपद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रक्रिया या बळावर जागतिक पातळीवर गुणवत्तेच्या बाबतीत स्वतःचा एक बेंचमार्क निर्माण केला आहे. प्रिसिजनने आपल्या स्थापनेपासून एकाही क्षेत्रात अपयश न येऊ देता ६० दशलक्ष कॅमशाफ्टचा पुरवठा केला आहे. कंपनीकडे फोर्ड, जनरल, टोयोटा, मारुती सुझुकी, ह्युन्दाई, डेम्लर आणि पोर्श्चे हा वाहन उत्पादनातील मोठा ग्राहकाधार मिळविला आहे.

यतीन शहा यांनी सांगितले की, नाशिक स्थित मेम्को कंपनीच्या संपादनाची घोषणा करताना आनंद होत आहे. या संपादनामुळे औद्योगिक नेतृत्व कणखर होण्यासाठी आणि वैविध्यपूर्ण उत्पादन श्रेणीमध्ये येण्यासाठी बळ मिळेल. मेम्को ही कंपनी आर्थिकदृष्ट्या मजबूत असून १८ टक्के सकल वार्षिक वृद्धी दर राखला आहे. मेम्को कंपनीची वार्षिक १०.७ दशलक्ष घटकांच्या उत्पादनाची क्षमता आहे. बॉश, डेल्फी, एण्ड्रेस हाऊजर, गिरो अशा ग्राहकांशी दीर्घकालीन विश्वासार्हता मिळवत पुरवठा केला आहे. मेम्को प्रामुख्याने पारंपरिक सीआरडीआय डिझेल इंजिनसाठी लागणारे फ्युएल इंजेक्शन कंपोनेन्टस्, ब्रेक कंपोनेन्टस्, तसेच जहाजांसाठी लागणारे हाय प्रेशर डिझेल इंजेक्टर्स तसेच विविध उपकरणांसाठी लागणारे घटक उत्पादित करते. या संपादनामुळे उत्पादनातील अनुभव आणि वाढलेली आर्थिक क्षमता यामुळे प्रिसिजनला नाशिकमधून व्यवसाय वाढीची संधी मिळाली आहे. मेम्कोचा व्यवसाय वाढण्यासाठी नव्या आणि जुन्या ग्राहकांशी आम्ही आधीपासूनच संपर्कात आहोत. प्रिसिजनचे संचालक आणि मुख्य वित्त अधिकारी रवींद्र जोशी यांनी सांगितले की, व्यवसायाचा आकार, उत्पादन, भौगोलिक स्थान आणि प्रमाणबद्धता याचा विचार करता प्रिसिजनसाठी हे एक अतिशय उत्तम संपादन आहे. राजन धारकर व सौ. विनिता धारकर हे पुढील दोन वर्षांसाठी मेम्कोची धुरा सांभाळतील.

अगदी अलीकडे प्रिसिजनने नजरल मोटार्सकडून सहा दशलक्ष फुल्ली फिनिश्ड कॅमशाफ्टचा जागतिक पातळीवरील व्यवसाय प्राप्त केला आहे. हा प्रकल्प जोपर्यंत चालू आहे तोपर्यंतचाच हा करार आहे. या कराराचे अंदाजित मूल्य जवळपास ५८० कोटी रुपये इतके आहे. तसेच फोर्ड मोटार्सकडून जागतिक पातळीवरील आठ दशलक्ष फुल्ली फिनिश्ड कॅमशाफ्टचा व्यवसाय प्राप्त झाला आहे, ज्याचे एकंदर अंदाजित मूल्य ५५० कोटी इतके आहे. २०१८-१९ पासुन दोन्ही करारांतर्गत कॅमशाफ्टचे नियमित उत्पादन सुरू होईल.

प्रिसिजन कॅमशाफ्ट लिमिटेड ही कंपनी प्रवासी वाहनांच्या इंजिनमधील अत्यंत क्लिष्ट अशा कॅमशाफ्टचे उत्पादन आणि विक्री करणारी जगातील अग्रगण्य कंपनी आहे. कंपनीतर्फे प्रवासी वाहने, ट्रॅक्टर, हलकी व्यापारी वाहने, रेल्वे इंजिन आदींसाठी लागणाऱ्या जवळपास ५० प्रकारच्या कॅमशाफ्टचा पुरवठा करते.